पुण्य नगरी ▪ शुक्रवार, २६ जून २०२६

# दररोज अभ्यास केल्यास यशप्राप्ती : शहा

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी झपाटून अभ्यास करण्यापेक्षा दररोज थोडा-थोडा नियोजनबद्ध अभ्यास केल्यास बारावी बोर्ड परीक्षेमध्ये उज्ज्वल यश प्राप्त करता येते, असे मत बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थिनी मनुश्री शहा हिने व्यक्त केले. येथील विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या कला, वाणिज्य शाखेच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रमात ती बोलत होती. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले होत्या. यावेळी गुणवंत विद्यार्थी अनुष्का मोरे, आर्या दीक्षित, स्वालिहा चौधरी, स्नेहम माने, शाल्मली देशपांडे , यशोधन अनुसे, सना देसाई यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. प्रास्ताविक प्रा. यू. एच. तिजाईकर यांनी केले. आभार प्रा. एस. पी. वेदांते यांनी मानले.